MHND060011692020

**नियमित दिवाणी दावा क्र.१५५/२०२०**
संजय व इतर वि... शिवरीया व इतर

.

**निशाणी क्र.०५ वरील आदेश**
(दिनांक १०.०२.२०२१)

१. प्रस्तुतचा अर्ज अर्जदार/वादींनी तात्पूरता मनाई हुकूम मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

**अर्जातील वादींचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे –**

२. वादींचे कथन आहे की, मौजे तमलूर, ता. देगलूर, जि. नांदेड येथील सर्व्हे क्र. २९६, गट क्र. ६०४ मधील ४ एकर १९ गुंठे जमीनीचे मालक शिवलिंग परबन्ना व शिवरय्या बसप्पा हे होते. त्यांची जमीन धारणा ही कमाल मर्यादेपेक्षा जास्त असल्याने नागप्पा कामाजी मुळे यांना हैद्राबाद कुळ वहीवाट कायदयानुसार कुळ म्हणून सदरील १ हे. ७९ गुंठे वाद मिळकत जमीन शासनाने प्रदान केली. तसे कलम ३८–ई नुसार प्रमाणपत्र देखील नागप्पा मुळे यांना देण्यात आले. अशा प्रकारे नागप्पा हे कुळ म्हणून सदरील जमीनीचे मालक व ताबेदार झाले.

३. वादींचे कथन आहे की, सदरील प्रमाणपत्र अद्यापही अस्तित्वात असून, कोणत्याही प्राधिकरणाने ते रद्द केलेले नाही. त्यानुसार वादींचे पुर्वाजांनी तहशिलदाराकडे कार्यवाही देखील केली आहे. वादींचे कथन आहे की, गंगुबाई विठ्ठलराव यांच्या निधनानंतर प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी कोणताही हक्क नसतांना त्यांचे नाव सातबारा अभिलेखात लावून घेतले. वादींचे कथन आहे की, सदरील गंगुबाई हिने वादींच्या उपरोक्ष न्यायालयातून शासनाविरुध्द हुकूमनामा प्राप्त केला, जो त्यांचेवर बंधनकारक नाही. वादींचे कथन आहे की, नागप्पा यांचे वारस म्हणून त्यांना सदरील जमीनीत हक्क निर्माण झालेला आहे.

४. वादींचे कथन आहे की, प्रतिवादी क्र.५ ते ८ यांना वाद जमीनीत काहीही

हक्क नसतांना तसेच वाद जमीन ही संपादीत केलेली नसतांना देखील त्यांनी वाद मिळकतीत प्राथमिक आरोग्य केंद्र उभारणे चालू केले आहे. त्यामुळे वादींना हा दावा मालकी हक्काची घोषणा व कायमचा मनाई हुकूम मिळण्यासाठी दाखल करावा लागला. या अर्जाद्वारे वादी हे प्रतिवादी क्र.६ ते ८ यांना वाद मिळकतीवर प्राथमिक आरोग्य केंद्राचे बांधकाम करण्यास तात्पुरती मनाई करण्याची विनंती करतात.

५. प्रतिवादी क्र. ५ ते ७ दाव्यात हजर झाले व त्यांनी त्यांची कैफियत (निशाणी २९) दाखल केली. तसेच पुरसिस (निशाणी ३१ व ३४) दाखल करुन सदरील कैफियत हिच त्यांचे या अर्जास म्हणणे समजावे असे सांगितले. वादीने निशाणी क्र.२६ वरील अर्जानुसार प्रस्तुतचा दावा हा प्रतिवादी क्र.८ विरुध्द काढून घेतलेला आहे. उर्वरित प्रतिवादी क्र.५ ते ७ यांनी अर्जातील सर्व प्रतिकुल कथने नाकारली.

६. प्रतिवादींनी कथन केले की, वादी अथवा त्यांचे पूर्वज नागप्पा यांचे ताब्यात कधीही वाद मिळकत नव्हती. शासनाने गट क्र.६०४ मधील २ एकर जमीन ही आबादीकरीता संपादीत केली. तसेच गट क्र.६०४ च्या मुळ मालकांनी त्या गटातील जमीन ही रुग्णालयाकरीता दान केलेली होती. प्रतिवादींनी कथन केले की, सन १९८३ पूर्वीपासून सदरील गट क्र.६०४ मध्ये जिल्हा परिषद शाळा व प्राथमिक आरोग्य केंद्राची इमारत उभी आहे. सदरील आरोग्य केंद्राच्या इमारतीच्या पुर्नबांधणीची मंजूरी मिळाल्यानंतर तेथे इमारतीचे पुर्नबांधणीचे काम चालू आहे. त्याकरीता बराचसा खर्च झालेला आहे. प्रतिवादींनी कथन केले की, वादींनी खोटा दावा दाखल केलेला असून, अर्ज नामंजूर करण्यात यावा.

७. वादी व प्रतिवादी यांच्या परस्पर कथनांचा व अभिलेखावरील कागदपत्रांचा सारासार विचार करता खालील मुद्दे माझ्या विचारार्थ असुन, त्यावरील निष्कर्ष मी त्याखाली दिलेल्या कारणांसाठी नोंदवित आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १) | अर्जदार प्रथमदर्शनी हक्क शाबीत करतात काय ? | नकारार्थी |
| २) | सोयीस्करतेचा तोल अर्जदारांच्या बाजूने आहे काय ? | नकारार्थी |

| | | |
|---|---|---|
| ३) | तात्पुरता मनाई हुकुम न दिल्यास अर्जदारांचे अपरिमित नुकसान होणार आहे काय ? | नकारार्थी |
| ४) | आदेश काय? | अर्ज नामंजूर करण्यात येतो. |

## कारणमिमांसा

### मुद्दा क्र.१ ते ३ करीता –

८. दोन्ही बाजुंचा युक्तिवाद ऐकला. अर्जदारांचे वतीने युक्तिवाद करण्यात आला की, नागप्पा यास हैद्राबाद कुळवहीवाट कायदयानुसार प्रमाणपत्र प्रदान करण्यात आल्याने मुळ मालकाचे हक्क संपुष्टात येवून सदरील नागप्पा हा वाद मिळकतीचा मालक झालेला होता. सदरील वाद मिळकतीवर हक्क नसताना तसेच वाद मिळकतीचे संपादन झालेले नसताना प्रतिवादी क्र.५ ते ७ हे त्यावर प्राथमिक आरोग्य केंद्राचे बांधकाम करत आहेत, जे बेकायदेशीर आहे. सबब, वादींना मालकी हक्काची घोषणा व कायमचा मनाई हुकूम मिळण्यासाठी दावा दाखल करावा लागला असून, त्यांचा अर्ज मंजूर करण्यात यावा. त्यांच्या म्हणण्या पृष्टयर्थ त्यांनी निशाणी क्र.७ वरील यादीप्रमाणे मुळ प्रमाणपत्र व इतर कागदपत्रे दाखल केली.

९. प्रतिवादींच्या वतीने म्हणणे मांडण्यात आले की, शासनाने गट क्र.४०६ मधील २ एकर जागा आबादीसाठी संपादीत केली होती. त्यामध्ये १९८३ पूर्वीपासून शाळा व प्राथमिक आरोग्य केंद्र अस्तित्वात आहे. आरोग्य केंद्राची इमारत मोडकळीस आल्याने ती पाडून नविन बांधण्याचा प्रस्ताव जिल्हा परिषदेने मंजूर केला व त्याप्रमाणे निविदा मागवून काम सुरु झालेले आहे. त्यांनी युक्तिवाद केला की, सदरील नागप्पा हे कधीही वाद मिळकतीचे ताबेदार नव्हते. सबब, सदरील अर्ज नामंजूर करण्यात यावा.

१०. दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकले. निशाणी क्र.७ वरील यादीसोबत दाखल कागदपत्रे पाहता असे दिसते की, नागप्पा कामाजी मुळे यांना हैद्राबाद कुळ व शेतकी कायदा, १९५० च्या कलम २५ व ३७ अन्वये प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले आहे. तथापि, निशाणी क्र.४० वरील यादीसोबत दाखल केलेले कागदपत्र पाहता असे दिसते की, सातबारा उता–यामध्ये इतर अधिकारात गंगाराम व नागप्पा काबीज नाही असा

उल्लेख करण्यात आलेला आहे. तसेच सन १९८३ पूर्वीपासून सदरील जागा ही शाळा व आबादीकरीता ठेवण्यात आल्याचे दिसते. म्हणजेच वाद जागेवर पूर्वीपासून शाळा व प्राथमिक आरोग्य केंद्राची इमारत उभी होती असे दिसते.

११. निशाणी क्र.४० सोबत दाखल केलेले कागदपत्र पाहता असे दिसते की, दिनांक ११.०९.२०२० रोजी जिल्हा परिषद नांदेड यांनी ठराव घेवून प्राथमिक आरोग्य केंद्र शहापूर अंतर्गत तमलूर येथील वापरण्यास अयोग्य असलेली इमारत पाडून नविन इमारत बांधकाम करण्याचा प्रस्ताव मंजूर केला. तशी निविदा देखील काढण्यात आली व बांधकाम सुरु झालेले आहे. दाखल फोटो पाहता असे दिसते की, जुने बांधकाम पाडून नविन बांधकाम करण्याचे कार्य चालू आहे.

१२. दाव्यात वादींनी केवळ प्रमाणपत्र दाखल केले. तथापि, वाद मिळकतीवर त्यांचा अथवा त्यांच्या पूर्वजांचा कधी व कोणत्या कालावधीत ताबा होता हे कागदपत्राद्वारे दर्शविलेले नाही. सबब, प्रथमदर्शनी असे दिसते की, पूर्वीपासून तेथे शाळा व प्राथमिक रुग्णालय होते व रुग्णालयाचे जुने बांधकाम पाडून नविन बांधकाम करण्यात येत आहे. वादींच्या पूर्वजांना मालकी हक्क प्राप्त झाला होता काय? त्यांचे अथवा वादींचे ताब्यात वाद मिळकत होती काय ? हे पाहणे पुराव्याचा भाग आहे. याक्षणी वादींच्या मालकी अथवा ताब्याबाबत प्रथमदर्शनी प्रकरण नाही. चालू असलेले बांधकाम हे आबादीमध्ये नाही असे वादींचे कथन असल्याचे दिसत नाही. सबब, सोईस्करतेचा तोल वादींच्या हक्कात नाही. पूर्वीपासून वाद मिळकतीवर बांधकाम उभे होते व जुने बांधकाम पाडून नविन बांधकाम होत असल्यास आता वादींचे नुकसान होईल असे वाटत नाही. याउलट मनाई हुकूम देवून बांधकाम थांबविल्यास व भविष्यात सदरील जागा संपादीत केलेली होती हे सिध्द झाल्यास शासनाचे पर्यायी जनतेचे नुकसान होईल. सबब, मी मुद्दा क्र.१ ते ३ चे उत्तर नकारार्थी देत आहे.

**<u>मुद्दा क्र.४ करीता</u> –**

१३. वरील मुद्दा क्र.१ ते ३ वर नोंदविलेल्या कारणावरुन मी या निष्कर्षाप्रत आलेलो आहे की, अर्ज नामंजूर होण्यास पात्र आहे. सबब, खालील प्रमाणे आदेश पारित करण्यात येतो.

**<u>आदेश</u>**

१) अर्ज नामंजुर करण्यात येतो.

२) खुल्या न्यायालयात घोषीत.

Digitally signed by Nilesh Subhash Budruk
Date: 2021.02.10 17:18:25 +0530

**(नीलेश सु. बुद्रुक)**

दिनांकः १०.०२.२०२१

दिवाणी न्यायाधीश व.स्तर,
बिलोली.